ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

# आरती

प्रा. डॉ. सुनील म. पवार,
ज. ए. इ. चे महिला महाविद्यालय,
स. वा. जोशी विद्यासंकुल,
डोंबिवली (पूर्व) – 421201

**पार्श्वभूमी –**

महाराष्ट्रात निरनिराळ्या देवदेवतांच्या आरत्या प्राचीन काळापासून प्रचलित आहेत. तबकात निरंजन पेटवून किंवा अनेक वाती पाजळून त्या देवाभोवती ओवाळण्याला आरती करणे म्हणतात. यावेळी एक गीतप्रकार म्हटला जातो. सामूहिकपणे म्हणावयाचा हा गीतप्रकार घंटा, झांज, इत्यादी वाद्ये वाजवून म्हणतात. त्यात देवतेचे रुपवर्णन, गुणवर्णन आणि स्तुती असते या देवतेने ऐश्वर्याची कामना पूर्ण करावी अशी प्रार्थनाही असते. देवतेची पूजा करणारी व्यक्ती आरती ओवाळते.

पूर्वी राजे महाराजे, विजयी वीर, विव्दान पंडित यांनाही आरती ओवाळीत. मंगल कार्यात वधुवरांना तसेच उपनयनाच्या वेळी मुंज्या मुलालाही आरती ओवाळतात. दिवाळी, दसरा, पाडवा या दिवशीही आरती ओवाळण्याची प्रथा आहे. लिंगायत लोकांमध्ये तरुणाचे प्रेत घरात असेपर्यंत पत्नी त्याला आरती ओवाळते. दृष्ट लागू नये, मृत व्यक्ती भूतयोनीत प्रविष्ट होऊ नये असे निरनिराळे हेतू त्यामागे असतात. यावेळी गीत म्हणत नाहीत.

देवदेवतांच्या आरतीच्या वेळी जी गीते म्हटली जातात त्यांनाही आरती असेच म्हणतात. त्याची रचना सांकेतिक असून त्यांच्या चाली ठराविक असतात. पालुपदांचे वर्तन लोकगीतांसारखेच असते. या आरती व्यक्तींनी रचलेल्या असल्या आणि त्यांची नावे गोवलेली असली तरी त्यांचा सर्वांनी स्वीकार केलेला असतो. मौखिक परंपरेने या आरत्या चालत आलेल्या आहेत. लोकांनी त्याचा स्वीकार केलेला आहे.

**आरती – स्वरुपमीमांसा –**

प्रज्वलित निरांजन, पणती किंवा दिवा तबकात ठेवून त्याने देव गुरु यांना ओवाळण्याच्या विधीला आरती म्हणतात. तसेच त्यावेळी देवाचे किंवा गुरुचे स्तुतीपर गीत म्हणतात त्यालाही

आरती असेच नाव आहे. ''आरात्रिक'' या संस्कृत शब्दापासून आरती हा शब्द तयार झाला आहे. बंगाली भाषेत मात्र आरतीसाठी आरात्रिक हाच शब्द वापरला जातो.

आरतीत त्या–त्या देवतेची स्तुती केलेली असते. आणि त्या देवतेकडे मंगलाची आणि ऐश्वर्याची आराधना केलेली असते. सुखकर्ता दुःखहर्ता ही गणपतीची, लवथवती विक्राळा ही शंकराची, दुर्गे दुर्गट भारी ही देवीची, युगे अठ्ठावीस ही पांडुरंगाची, आरती ज्ञानराजा ही ज्ञानेश्वरांची इत्यादी आरत्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत.

मराठी भाषेच्या आरंभकालापासून आजमितीपर्यंत आरतीची रचना चालू आहे. इ.स. 12 व्या शतकातील महानुभाव कवींनी आणि ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या सर्व संतश्रेष्ठींनी आरत्या रचल्या आहेत. याशिवाय काही पंडितकवींनी आरत्या लिहिल्या आहेत. आधुनिक संतांच्या शिष्यांनीही गुरुंच्या आरत्या रचून गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. उदा. सिद्धारुढस्वामी, स्वामीसमर्थ, साईबाबा, गोंदवलेकर महाराज, यशवंतराव महाराज, गुरुदेव रानडे अशा कितीतरी सत्पुरुषांच्या आरत्या रचण्यात आल्या आहेत.

श्री. ल. रा. पांगारकर यांनी ''आरती'' वाड्.मयाविषयी गौरोव्दगार काढले आहेत. ते म्हणतात, ''मराठी भाषेतील आरत्या हे भक्तीरस प्रधानकाव्य मंदिरातील एक स्वतंत्र असे देवघर आहे. त्या देवघरात परमेश्वराचे सुरम्य, सगुणस्वरुप आणि भक्त याशिवाय काही दिसायचे नाही. देव आणि भक्त यांच्यामधील पूज्य – पूजकासंबंधाचे साक्षात दर्शन घडविणारे आरसे म्हणजेच या आरत्या होय. यातील गणपतीच्या आरत्यातील सहजगतीचे वर्णने, मारुतीच्या आरत्यांतील भयजनक वर्णने अशा अनेक प्रकारच्या वर्णन चमत्काराने, नवनवोन्मेषाने या आरत्यांमध्ये उल्हासित झाले आहेत. आणि या सर्व वर्णन चमत्कृतींची माला एकाच भक्ती सूत्रात गुंफून ती ईश्वरार्पण केलेली आहे.''

इ.स. 12व्या शतकापासून 19व्या शतकापर्यंत रचल्या गेलेल्या आणि उपलब्ध असलेल्या आरत्यांची संख्या सुमारे 700–800 आहे. ज्ञानेश्वरांनी थोड्याच आरत्या रचलेल्या आहेत. त्यांची ''फळले भाग्य माझे'' ही आरती विशेष उल्लेखनीय आहे. या आरतीत सद्गुरु उपदेशाची महती सांगून पंढरीरायाच्या राऊळात आलेला दिव्य अनुभव त्यांनी मार्मिकपणे सांगितला आहे. त्याच कालखंडातील नामदेवांनी बऱ्याच आरत्या रचल्या आहेत. आणि त्या विठ्ठलाच्या आहेत. नित्यारती, काकडाआरती, शेजारती अशा विविध आरत्या रचल्या आहेत. आजही पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात युगे अठ्ठावीस, उठा उठा हो साधक इत्यादी आरत्या

म्हटल्या जातात. यानंतरच्या काळात गुरुचरित्रकार गंगासरस्वती, दासोपंत, पाठक मंडळी, नरहरी, विष्णूदास नामा, त्र्यंबक, कृष्णदास इ. अनेक कवींनी आरत्या लिहिल्या. पुढे इ.स. 16व्या शतकात एकनाथ, राजा जनार्दन, जनी जनार्दन, विठा रेणुकानंदन, कृष्णदास, अनंत सूत इ. कवींनी आरत्यांची रचना केली. एकनाथांचा नातू मुक्तेश्वर यांनी आरती लेखनातही आपले वैशिष्ट्य दाखविले आहे. त्यांनी बऱ्याच आरत्या लिहिल्या असून एकनाथांच्या चरित्रावर त्यांनी लिहिलेल्या आरत्या नाविन्यपूर्ण आहेत.

इ.स. 17 व्या शतकात तुकाराम, रामदास यासारखे महान संत व वामन रघुनाथसारखे पंडित कवी होऊन गेले. या सर्वांनी आरती वाङ्‌मयात मोलाची भर घातली आहे. तुकारामांच्या आरत्या भावपूर्ण आहेत. पण या कालखंडातील रामदासी संप्रदायाचा वेगळेपणा त्यांच्या आरत्यांमध्ये ही दिसतो. या संप्रदायाचे दैवत श्रीराम आणि त्यांचे भक्त हनुमान यांच्या अनेक आरत्या त्या काळात रचल्या गेल्या. रामदासांच्या आरत्यात शब्दप्रभुत्व, आशय व काव्य यांचा संगम झालेला आढळतो. त्यांच्या शिष्यांनी सद्‌गुरुविषयी आरत्या लिहिल्या.

वामनपंडित व मौनीसिद्ध यांच्या आरत्याही उल्लेखनीय आहेत. त्या काळातील शेख महंमद या मुसलमान कवीनेही आरत्यांची रचना केली आहे.

पुढील शतकातही आरत्यांची रचना चालूच राहिली. श्रीधर, मोरोपंत, कृष्णदयार्णव, जगजीवन, परशुराम, तुका, मोरेश्वरसुत, नरहरी, निरंजन, विप्रनारायण, महीपती, ठाकुरदास इ. कवींनी आपापल्या पद्धतीने आरत्या रचल्या.

मौनी विरचित विठ्ठलाची एक आरती–

जय जय कटकर विठ्ठल चिन्मय सुखराशी।
सर्वही व्यापक ब्रह्म तू पंढरपुरवासी।
पुंडलिक वरप्रद आपणां म्हणविसी।
निजभक्तांस्तव नाना नटवेषा धरिसी।।धृ.।।

**महत्वाच्या आरत्या** – 1. श्री गणपतीची आरती, 2. श्री स्वामी समर्थ महाराजांची आरती, 3. श्री. नारायणाची आरती, 4. विशेष प्रसंगी करावयाची श्री देवीची आरती, 5. औदुंबर प्रदक्षिणा.

आरती हा प्रकार स्तुतीच्या वेशातील असला तरी आरती म्हणजे स्तोत्र नव्हे. आरती ही गेय असते हे खरे, पण आरतीत स्तोत्राप्रमाणे मंत्रसामर्थ्य असत नाही. आरती ही एकट्याने

अगर समूहाने गाण्याचे स्तुतिगीत आहे. ही स्तुती बहुशः परमेश्वराची असते. परमेश्वराचा धावा, त्याने आपल्याला पावावे अशी आळवणी, परमेश्वराचे वर्णन, परमेश्वराच्या पराक्रमांची उजळणी, आणि तो दीनदुबळ्यांचा तारक आहे याचे त्यालाच करुन दिलेले स्मरण, असे आरतीच्या गीतरचनेचे स्वरुप असते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. रुप–निरुपण : डॉ.देशपांडे शिरिष गोपाळ
2. लोकसाहित्याची रुपरेषा : भागवत दुर्गा
3. लोकसाहित्याचे अंतःप्रवाह : मांडे प्रभाकर
4. संज्ञा–समीक्षा कोश, खंड 4 : विजया राजाध्यक्ष (संपादक)
5. सांस्कृतिक कोश : संपादकीय
6. आरती संग्रह